RNI No. MAHBIL /2009/35530

COURT BOOK
EMPOWERING LEGAL CLARITY

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार

वर्ष २, अंक ३३] बुधवार, ऑगस्ट २४, २०१६/भाद्र २, शके १९३८ [पृष्ठे ५, किंमत : रुपये २३.००

### असाधारण क्रमांक ४७

### प्राधिकृत प्रकाशन

महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम.

अनुक्रमणिका

सन २०१६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३१.—विवक्षित राज्य अधिनियम निरसित करण्यासाठी अधिनियम. पृष्ठे १ ते ५

दिनांक २३ ऑगस्ट २०१६ रोजी माननीय राज्यपालांनी संमती दिलेला महाराष्ट्र विधानमंडळाचा पुढील अधिनियम माहितीसाठी, याद्वारे, प्रसिद्ध करण्यात येत आहे.

**प्रकाश हिं. माळी,**
प्रधान सचिव,
महाराष्ट्र शासन,
विधि व न्याय विभाग.

---

### सन २०१६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३१.

(माननीय राज्यपालांची संमती मिळाल्यानंतर **"महाराष्ट्र शासन राजपत्रात"** दिनांक २४ ऑगस्ट २०१६ रोजी प्रथम प्रसिद्ध केलेला अधिनियम.)

### विवक्षित राज्य अधिनियम निरसित करण्यासाठी अधिनियम.

**ज्याअर्थी,** विवक्षित राज्य अधिनियम निरसित करणे इष्ट आहे ; **त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या सदुसष्टाव्या वर्षी, याद्वारे, पुढीलप्रमाणे अधिनियम करण्यात येत आहे :—

१. या अधिनियमास, महाराष्ट्र निरसन अधिनियम, २०१६ असे म्हणावे. संक्षिप्त नाव.

२. यास जोडलेल्या अनुसूचीमध्ये विनिर्दिष्ट केलेले अधिनियम याद्वारे निरसित करण्यात येत आहेत. विवक्षित अधिनियमांचे निरसन.

३. या अधिनियमान्वये कोणताही अधिनियम निरसित केल्यामुळे, त्याचा, ज्या कोणत्याही इतर अधिनियमात तो लागू करण्यात आला असेल, तो समाविष्ट करण्यात आला असेल किंवा त्याचा उल्लेख करण्यात आला असेल, त्यावर परिणाम होणार नाही ; व्यावृत्ति.

आणि या अधिनियमामुळे, या अगोदरच केलेली किंवा करू दिलेली कोणतीही गोष्ट किंवा या अगोदरच संपादन केलेला कोणताही हक्क किंवा मालकी हक्क, प्राप्त झालेले कोणतेही आबंधन किंवा पत्करलेली जबाबदारी, किंवा त्यासंबंधातील कोणतीही उपाययोजना किंवा कामकाज, किंवा कोणतेही कर्ज, शास्ती, आबंधन, जबाबदारी, दावा किंवा मागणी यांत दिलेली सूट किंवा केलेली मुक्तता, किंवा अगोदरच दिलेली कोणतीही हमी किंवा पूर्वीच्या कोणत्याही कृत्याचा किंवा गोष्टीचा पुरावा यांची वैधता, अवैधता, प्रभाव किंवा परिणाम यास बाध येणार नाही.

तसेच, या अधिनियमामुळे, विधीचे कोणतेही तत्त्व किंवा नियम किंवा प्रस्थापित क्षेत्राधिकार, वाद, प्रतिवादाचे स्वरूप किंवा त्याचा क्रम, प्रथा किंवा कार्यपद्धती किंवा प्रचलित रिवाज, रूढी, विशेषाधिकार, निर्बंध, माफी, पद किंवा नेमणूक या गोष्टीस बाध येणार नाही, मग, त्या गोष्टी अनुक्रमे याद्वारे निरसित केलेल्या कोणत्याही अधिनियमान्वये संमत केलेल्या असल्या किंवा त्यांस अशा अधिनियमात मान्यता मिळालेली असली किंवा त्या अशा अधिनियामातून निष्पन्न झालेल्या असल्या तरी हरकत नाही.

तसेच, या अधिनियमान्वये कोणताही अधिनियम निरसित केल्यामुळे, सध्या अस्तित्त्वात किंवा अंमलात नसलेला कोणताही क्षेत्राधिकार, पद, रूढी, जबाबदारी, हक्क, मालकीहक्क, विशेषाधिकार, निर्बंध, माफी, रिवाज, प्रथा, कार्यपद्धती किंवा इतर बाब किंवा गोष्ट पुन्हा अस्तित्त्वात किंवा अंमलात येणार नाही.

COURT BOOK
EMPOWERING LEGAL CLARITY

## अनुसूची

(कलम २ पहा)

| अनु क्र. (१) | वर्ष (२) | क्रमांक (३) | संक्षिप्त नाव (४) |
|---|---|---|---|
| १ | १८७६ | १५ | महाराष्ट्र नगरपालिका ऋणपत्र अधिनियम. |
| २ | १८८२ | ७ | महाराष्ट्र लँडिंग व व्हार्फेज फी अधिनियम. |
| ३ | १८८८ | १२ | मुंबई शहर नगरपालिका (पुरवणी) अधिनियम, १८८८. |
| ४ | १८९८ | १ | मुंबई शहर नगरपालिका गुंतवणुकीबाबत अधिनियम, १८९८. |
| ५ | १९१८ | ६ | महाराष्ट्र परकीय इसमांच्या अपात्रतेबाबत अधिनियम. |
| ६ | १९२२ | ११ | कैद्यांची ओळख पटवणे (मुंबई सुधारणा) अधिनियम, १९२२. |
| ७ | १९३३ | २० | इलाखा शहर नादारी (मुंबई सुधारणा) अधिनियम, १९३३. |
| ८ | १९३५ | २१ | कैद्यांची ओळख पटवणे (मुंबई दुसरी सुधारणा) अधिनियम, १९३५. |
| ९ | १९३६ | १५ | भारतीय लुनसी, मुंबई जिल्हा नगरपालिका आणि मुंबई बरो नगरपालिका (सुधारणा) अधिनियम, १९३६. |
| १० | १९३८ | १८ | भूमि संपादन (मुंबई सुधारणा) अधिनियम, १९३८. |
| ११ | १९३९ | १५ | इलाखा शहर नादारी व प्रांतिक नादारी (मुंबई सुधारणा) अधिनियम, १९३९. |
| १२ | १९४५ | २० | भूमि संपादन (मुंबई सुधारणा) अधिनियम, १९४५. |
| १३ | १९४८ | २२ | महाराष्ट्र निर्वासित अधिनियम. |
| १४ | १९४८ | ५१ | इलाखा शहर नादारी (मुंबई सुधारणा) अधिनियम, १९४८. |
| १५ | १९५० | ७ | मुंबई नगरपालिका (हद्दी वाढविण्याबाबत) अधिनियम, १९५०. |
| १६ | १९५४ | ६८ | मुंबईचा बिगर अनुसूचित (अंशतः वगळलेल्या) क्षेत्रांना कायदे लागू करण्याबाबत अधिनियम, १९५४. |
| १७ | १९५५ | १६ | प्रांतिक लघुवाद न्यायालये (दावे कायदेशीर ठरविण्यासंबंधी) अधिनियम, १९५५. |
| १८ | १९५६ | ५८ | मुंबई म्युनिसिपल (हद्दी आणखी वाढविणे आणि अनुसूची बबअ) (सुधारणा) अधिनियम, १९५६. |
| १९ | १९५७ | १ | सर चिनुभाई माधवलाल रणछोडलाल बॅरोनसी अधिनियम (रद्द करण्याबाबत) अधिनियम, १९५६. |
| २० | १९५७ | ३६ | सर ससून जेकब डेव्हिड बॅरोनसी (रद्द करण्याबाबत) अधिनियम, १९५७. |
| २१ | १९५८ | ४६ | मुंबई नगरपालिका सदस्यांची अपात्रता (शंका निरसन) अधिनियम, १९५८. |
| २२ | १९५८ | ४८ | मुंबईच्या शर्यतीच्या जागांबद्दल लायसेन्स देण्याबाबत आणि मुंबई पण कर (व्याप्ती वाढविणे व सुधारणा यांबाबत) अधिनियम, १९५८. |
| २३ | १९६० | ९ | सर करीमभाई इब्राहिम बॅरोनसी (रद्द करणे व विश्वस्त मालमत्तेची वाटणी) अधिनियम, १९५९. |
| २४ | १९६१ | ८ | मुंबई नगरपालिका कर आणि नगर स्थावर मालमत्ता कर (बृहन्मुंबईच्या वाढविण्यात आलेल्या उपनगरांतील विवक्षित क्षेत्रांत वैध ठरविण्याबाबत) अधिनियम, १९६०. |
| २५ | १९६२ | ४० | नगर स्थावर मालमत्ता कर (रद्द करणे) आणि सामान्य कर (कमाल दरात वाढ करणे) अधिनियम, १९६२. |

अनुसूची—चालू

| (१) | (२) | (३) | (४) |
|---|---|---|---|
| २६ | १९६३ | १० | मध्यप्रांत व वऱ्हाडचा डोळ्यांतील मोतीबिंदु काढण्याचे नियमन करण्याबाबत (महाराष्ट्र व्याप्ति व सुधारणा) अधिनियम, १९६२. |
| २७ | १९६४ | १९ | नागपूर शहर महानगरपालिका (सुधारणा) अधिनियम, १९६४. |
| २८ | १९६४ | ४० | मुंबई प्रसूति सहाय्य, हैदराबाद प्रसूति सहाय्य व मध्यप्रांत व वऱ्हाड प्रसूति सहाय्य (रद्द करणे) अधिनियम, १९६४. |
| २९ | १९६५ | २६ | सर कावसजी जहाँगीर बॅरोनसी (रद्द करणे) अधिनियम, १९६४. |
| ३० | १९६५ | ३४ | मुंबई प्रांतिक महानगरपालिका आणि नागपूर शहर महानगरपालिका (सुधारणा) अधिनियम, १९६५. |
| ३१ | १९६५ | ४३ | वक्फ (महाराष्ट्र सुधारणा) अधिनियम, १९६५. |
| ३२ | १९६५ | ४९ | अंबरनाथ मध्यंतरीय नगरपालिका (रचना व कार्ये) वैधकरण अधिनियम, १९६५. |
| ३३ | १९६६ | ३ | बरो नगरपालिका (इमारती व जमिनी यांवरील विवक्षित कर वैध ठरविणे) अधिनियम, १९६५. |
| ३४ | १९६७ | १ | मध्यप्रदेश गृहनिर्माण मंडळ (सुधारणा) अधिनियम, १९६६. |
| ३५ | १९६७ | ४६ | मुंबई ग्राम पोलीस (उप-विभागीय दंडाधिकाऱ्यांनी केलेल्या नियुक्त्या व शिस्तभंगाची कार्यवाही विधिग्राह्य करणे) अधिनियम, १९६७. |
| ३६ | १९६७ | ३५ | महाराष्ट्र महानगरपालिका (सुधारणा) अधिनियम, १९६७. |
| ३७ | १९६८ | २३ | नागपूर शहर महानगरपालिका (सुधारणा) अधिनियम, १९६८. |
| ३८ | १९६९ | ३ | महाराष्ट्र महानगरपालिका (सुधारणा) अधिनियम, १९६८. |
| ३९ | १९७१ | १ | मुंबई विक्रीकर (सुधारणा व विधिग्राह्यकरण उपबंध) अधिनियम, १९७०. |
| ४० | १९७१ | १३ | महाराष्ट्र महानगरपालिका (सुधारणा) अधिनियम, १९७०. |
| ४१ | १९७३ | १० | महाराष्ट्र औद्योगिक संबंध (विवक्षित कार्यवाह्यांची विधिग्राह्यता) अधिनियम, १९७२. |
| ४२ | १९७३ | २५ | भारतीय भागीदारीबाबत (महाराष्ट्र सुधारणा) अधिनियम, १९७३. |
| ४३ | १९७५ | ३ | नागपूर शहर महानगरपालिका (सुधारणा) अधिनियम, १९७४. |
| ४४ | १९७६ | ३२ | महाराष्ट्र न्यायालय शुल्क भरण्यासाठी विशेष तरतूद अधिनियम, १९७६. |
| ४५ | १९७६ | ३३ | महाराष्ट्र कुत्र्यांच्या शर्यतींच्या जागांसाठी लायसन्स देण्याबाबत अधिनियम, १९७६. |
| ४६ | १९७७ | ४२ | महाराष्ट्र महानगरपालिका (सुधारणा) अधिनियम, १९७७. |
| ४७ | १९७९ | २१ | मुंबई प्रांतिक महानगरपालिका व नागपूर शहर महानगरपालिका (सुधारणा) अधिनियम, १९७९. |
| ४८ | १९८० | ६ | महाराष्ट्र महानगरपालिका (सुधारणा) अधिनियम, १९८०. |
| ४९ | १९८० | २० | महाराष्ट्र नगरपालिका व महानगरपालिका (सुधारणा) अधिनियम, १९८०. |
| ५० | १९८१ | १२ | मुंबई प्रांतिक महानगरपालिका, नागपूर शहर महानगरपालिका आणि महाराष्ट्र नगरपालिका (सुधारणा) अधिनियम, १९८१. |
| ५१ | १९८१ | ६८ | मुंबई प्रांतिक महानगरपालिका, नागपूर शहर महानगरपालिका आणि महाराष्ट्र नगरपालिका (दुसरी सुधारणा) अधिनियम, १९८१. |
| ५२ | १९८१ | ६९ | मुंबई प्रांतिक महानगरपालिका, नागपूर शहर महानगरपालिका आणि महाराष्ट्र नगरपालिका (तिसरी सुधारणा) अधिनियम, १९८१. |
| ५३ | १९८३ | २७ | मुंबई प्रांतिक महानगरपालिका, नागपूर शहर महानगरपालिका आणि महाराष्ट्र नगरपालिका (सुधारणा) अधिनियम, १९८३. |

COURT BOOK
EMPOWERING LEGAL CLARITY

अनुसूची—समाप्त

| (१) | (२) | (३) | (४) |
|---|---|---|---|
| ५४ | १९८४ | ७ | मुंबई महानगरपालिका, मुंबई प्रांतिक महानगरपालिका, नागपूर शहर महानगरपालिका व महाराष्ट्र नगरपालिका (सुधारणा) अधिनियम, १९८४. |
| ५५ | १९८५ | ३ | मुंबई महानगरपालिका, मुंबई प्रांतिक महानगरपालिका, नागपूर शहर महानगरपालिका व महाराष्ट्र नगरपालिका (सुधारणा) अधिनियम, १९८५. |
| ५६ | १९८७ | ३८ | मुंबई प्रांतिक महानगरपालिका व नागपूर शहर महानगरपालिका (सुधारणा) अधिनियम, १९८७. |
| ५७ | १९८९ | २८ | महाराष्ट्र महानगरपालिका व नगरपालिका (सुधारणा) अधिनियम, १९८९. |
| ५८ | १९९० | ११ | महाराष्ट्र महानगरपालिका (सुधारणा) अधिनियम, १९९०. |
| ५९ | १९९० | १२ | महाराष्ट्र महानगरपालिका व नगरपालिका (सुधारणा) अधिनियम, १९९०. |
| ६० | १९९० | १३ | महाराष्ट्र महानगरपालिका व नगरपालिका (दुसरी सुधारणा) अधिनियम, १९९०. |
| ६१ | १९९० | ३३ | नागपूर शहर महानगरपालिका व महाराष्ट्र नगरपालिका (सुधारणा) अधिनियम, १९९०. |
| ६२ | १९९१ | १५ | महानगरपालिका (सुधारणा) अधिनियम, १९९१. |
| ६३ | १९९१ | २१ | महाराष्ट्र नगरपालिका (नगरपालिकांच्या निवडणुका तात्पुरत्या लांबणीवर टाकणे) अधिनियम, १९९१. |
| ६४ | १९९१ | २६ | महानगरपालिका (दुसरी सुधारणा) अधिनियम, १९९१. |

COURT BOOK
EMPOWERING LEGAL CLARITY

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004, EDITOR : SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI.